सन २०१५-१६ करिता इको टुरीझम
(राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन
स्थळांच्या विकास कामांकरिता निधी वितरण
बांबू वन उद्यान,वडाळी,अमरावती

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. निसप्र - २०१५/प्र.क्र.१४२/फ-५**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २५ जानेवारी, २०१६.

वाचा - १. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य,नागपुर यांचे पत्र क्र. कक्ष -१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.३२(भाग-२)/१५-१६,/१८१२/ दि.४/१/२०१६

२. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (निसर्ग पर्यटन व वन्यजीव प्रशासन),महाराष्ट्र राज्य,नागपुर यांचे पत्र कक्ष -२२(६)/योजना / प्र.क्र.८४/३९७६/१५-१६दि.७/१/२०१६

३. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१५ /प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.१७ एप्रिल, २०१५.

**प्रस्तावना -**

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये सन २०१५-१६ करिता वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत अमरावती वनवृत्तातील बांबू वन उद्यान,वडाळी,अमरावती पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी रू.१३६.४६ लक्ष इतक्या निधीचे प्रस्ताव सादर केले आहेत.

शासन निर्णय क्र.बैठक २०११/प्र.क्र.१७४/फ-५ दि.२४.१०.२०११ अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या अध्यक्षतेखालील गठित केलेल्या निसर्ग पर्यटन तज्ञ समितीच्या दिनांक १/१/२०१६ च्या बैठकीमध्ये सदरहू पर्यटन स्थळाच्या विकासासाठी सन २०१५-१६ करीता एकुण रू.१३६.४६ लक्ष निधी मंजुर करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

**शासन निर्णय :-**

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास ), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी सादर केलेल्या व निसर्ग पर्यटन तज्ञ समितीने संदर्भ क्रमांक -२ नुसार पर्यटन आराखड्यास मंजुरी दिल्याप्रमाणे बांबू वन उद्यान,वडाळी,अमरावती या पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी खालील विवरणपत्रामध्ये नमुद केलेली कामे करण्यासाठी उपलब्धतेनुसार एकुण **रू.६७.६१ लक्ष (रू. सदूशष्ट लाख ऐकसष्ठ हजार फक्त)** इतका निधी मंजुर करण्यात येत आहे.

(रक्कम - लाखात)

| अ.क्र. | कार्यान्वीत यंत्रणा | वनक्षेत्राचे नांव | कामाचा तपशिल | परिणाम | अंदाज पत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.) अमरावती | बांबू वन उद्यान,वडाळी अमरावती | Watch tower at Bamboo Garden at wadali, Amravati | | रू.१०.४४ |
| २ | | | Repair of nursery shed for Bamboo garden at wadali, Amravati | | रू.४.८४ |
| ३ | | | Construction of Ladies and Gents Toilet in Bamboo Garden at Wadali, Amravati | | रू.१४.५६ |
| ४ | | | Consruction of gangway and pagoda in futka talao for bird watching at wadali | | रू.१०.०० |
| ५ | | | Repairing of RCC well wall and M.S. cover at Bamboo garden at wadali, Amravati | | रू.४.६९ |
| ६ | | | Errecting 2.40 mtr High Chain-link fencing near Futka Talao in wadali Range | | रू२.३१ |
| ७ | | | Construction of Bamboo Chemical treatment tank in Bamboo Garden at Wadali | | रू.०.४२ |
| ८ | | | Area cleaning Levelling | | रू.१०.१३ |
| ९ | | | Purchase of garden Benches | ५० | रू.२.९७ |
| १० | | | signage | | रू.३.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | A) Hanging Board-33@2540/Nos,<br>B) Stand Board-100@1680/Nos<br>C) Round Board-49 @975/Nos | | |
| | | | Garden ACP-13 @9880/Nos | | रू.१.२८ |
| | | | Material for Signage Board | | रू.२.९७ |
| ११ | | | एकूण | | रू.६७.६१ |

सदरहू पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी पुढील प्रमाणे उद्दिष्ट निहाय खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(रक्कम रू. लाखात)**

| अ.क्र. | पर्यटन स्थळाचे नाव | उद्दिष्ठ निहाय अनुदान | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | | ०२-मजुरी | २१-पुरवठा व सामग्री | ५०-इतर खर्च | |
| १ | बांबु वन उद्यान ,वडाळी ,अमरावती | रू.३३.८० | रू.१६.९१ | रू.१६.९० | रू. ६७.६१ |

**सदरहू शासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे**.

१. उपरोक्त खर्च विहीत कार्यपद्धतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१५ -१६ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

२. प्रस्तावित कामातील पॅगोडा बांधणे, कर्मचाऱ्यांचे निवासस्थान , पर्यटकांना बसण्यासाठी बाक इ. कामांमध्ये लोखंडी सहित्या ऐवजी निसर्गपूरक असलेले साहित्य (उदा.बांबू इ. ) चा जास्तीत जास्त वापर करावा व त्या अनुषंगिकच निधी खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी.

३. प्रस्तावित सर्व कामांना सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी आहे याची खात्री करूनच कामे करावीत. तसेच सदरहू कामे करताना वन (संवर्धन) कायदा १९८०,भारतीय वन अधिनियम १९२७ ,वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना /आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुद्धा दक्षता घ्यावी.

४. शासन निर्णयात नमुद कामासाठी इतर स्त्रोतातुन निधी घेण्यात येणार नाही व कामाची व्दिरूक्ती होणार नाही याचे प्रमाणपत्र , उपयोगिता प्रमाणपत्रा सोबत द्यावे त्याशिवाय पुढील निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. सदरहू निधी सन २०१५-१६ साठी मागणी क्र.सी- ०७-२४०६ वनीकरण व वन्यजीवन,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२)(०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६ -२२९५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सदरहू शासन निर्णय शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१५ /प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.१७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१२५१७२८४३२५१९ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DHAS ANIL N

Digitally signed by DHAS ANIL N
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917247, postalCode=400032, st=Maharashtra, cn=DHAS ANIL N
Date: 2016.01.25 17:29:03 +05'30'

**( अनिल धस )**
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

**प्रति,**

१) प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य,नागपुर
२) प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य नागपुर
३) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक ( अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य,नागपुर
४) मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) अमरावती
५) महालेखापाल,१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षण) मुंबई / नागपुर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
७) कक्ष अधिकारी (व्यय-१०)(विनियम) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
८) ब-१/फ-१/फ-२ कार्यासन ,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
९) निवड नस्ती (फ-५).